




# भारताची पहिली डिजिटल जनगणना (अखेर) होत आहे

२०२१ ची जनगणना लांबल्यामुळे, भारताची शेवटची जनगणना २०११ मध्ये झाली होती. अद्ययावत लोकसंख्येच्या आकडेवारीवर आधारित धोरणांसाठी नवीन जनगणना अत्यंत महत्त्वाची आहे.

ऐच्छिक 'स्व-गणना' सुविधेमुळे, भारतातील रहिवासी आता गणनाकर्मचारी प्रत्यक्ष घरी भेट देण्यापूर्वी पंधरा दिवस आधीच, एका ऑनलाइन मंचावर आपल्या कुटुंबाची माहिती स्वतः नोंदवू शकतात.

**तुम्हाला हे माहित असणे आवश्यक आहे.**

# भारताची २०२७ ची जनगणना दोन टप्प्यांत होईल

## टप्पा १

घर-यादी आणि गृहगणना

(एप्रिल-सप्टेंबर २०२६)

- सरकार घरे, सुविधा आणि मालमत्तेबाबत माहिती संकलित करेल.
- गणनाकार तुमच्या घरी भेट देण्यापूर्वी १५ दिवस आधी, तुम्ही तुमची माहिती एका वेब पोर्टलवर देखील सादर करू शकता.

## टप्पा २

जनगणना

(फेब्रुवारी २०२७)

- लोकसंख्याशास्त्रीय माहिती, शिक्षण, स्थलांतर, प्रजननक्षमता इत्यादी, आणि प्रथमच, जातीय ओळखी, यांबाबतची माहिती संकलित केली जाईल.


**पहिल्या टप्प्यासाठीची स्वयं-गणना पुढील सहा महिन्यांच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने राबवली जाईल.**

# स्व-गणना म्हणजे काय?

स्वातंत्र्यानंतरची भारताची आठवी जनगणना लवकरच सुरू होणार आहे, आणि पहिल्यांदाच सर्व माहिती डिजिटल स्वरूपात नोंदवली जाईल.


स्व-गणना पद्धतीद्वारे, गणनाकार तुमच्या घरी भेट देण्यापूर्वीच तुम्ही तुमच्या कुटुंबाची माहिती ऑनलाइन पोर्टलवर स्वतः सादर करू शकता.

**स्व-गणना ही ऐच्छिक असून, ही प्रक्रिया सोपी करणे हा तिचा उद्देश आहे.**



# स्व-गणना (SE) कशी करावी?

सर्वप्रथम, se.census.gov.in या वेब पोर्टलवर जा. हे १६ भाषांमध्ये उपलब्ध आहे.



# स्व-गणना (SE) कशी करावी?

1 त्यानंतर, SE पोर्टलवर लॉग इन करा.

2 तुमचे राज्य/केंद्रशासित प्रदेश निवडा आणि कॅप्चा सोडवा.

3 नाव आणि मोबाईल क्रमांक टाका*

4 नकाशावर तुमचे स्थान शोधा.

5 कौटुंबिक तपशील भरा (घराचा प्रकार, मालमत्ता, घरातील विवाहित जोडपी, पिण्याच्या पाण्याचा स्रोत इत्यादी).

6 तुमची माहिती सादर करा आणि SE ID मिळवा.

7 जनगणना प्रतिनिधी जेव्हा तुमच्या घरी भेट देतील, तेव्हा त्यांना SE ID द्या.

*हे पोर्टल प्रत्येक कुटुंबासाठी एकाच क्रमांकाचा वापर करण्याची शिफारस करते; आदर्शतः हा क्रमांक ‘कुटुंबप्रमुखाचा’ असावा.

BEHAN BOX

# महत्त्वाच्या जाणून घेण्याजोग्या तारखा:

## एप्रिल

- अंदमान आणि निकोबार: १ ते १५ एप्रिल
- NDMC आणि दिल्ली छावणी मंडळ: १ ते १५ एप्रिल
- गोवा, कर्नाटक, लक्षद्वीप, मिझोरम, ओडिशा, सिक्कीम: १-१५ एप्रिल
- गुजरात, दादरा आणि नगर हवेली, दमण आणि दीव: एप्रिल 5-19
- उत्तराखंड: १०-२४ एप्रिल
- मध्य प्रदेश: १६-३० एप्रिल
- आंध्र प्रदेश: १६-३० एप्रिल
- अरुणाचल प्रदेश: एप्रिल १६-३०
- चंदीगड: १६-३० एप्रिल
- छत्तीसगड: १६-३० एप्रिल
- हरियाणा: १६-३० एप्रिल
- बिहार: १७ एप्रिल - १ मे

अनिर्णित: पश्चिम बंगाल

## मे

- तेलंगणा: २६ एप्रिल - १० मे
- पंजाब: ३० एप्रिल - १४ मे
- दिल्ली MCD क्षेत्रे: १ ते १५ मे
- महाराष्ट्र: १ - १५ मे
- मेघालय १-१५ मे
- राजस्थान: १ - १५ मे
- झारखंड: १ - १५ मे
- उत्तर प्रदेश: ७ - २१ मे
- जम्मू आणि काश्मीर, लडाख, पुदुच्चेरी: १७ मे - ३१ मे

## जून

- हिमाचल प्रदेश: १ - १५ जून
- केरळ: १६ - ३० जून
- नागालँड: १६ - ३० जून

## जुलै

- तमिळनाडू: १७ - ३१ जुलै
- त्रिपुरा: १७ - ३१ जुलै

## ऑगस्ट

- आसाम: २ - १६ ऑगस्ट
- मणिपूर: १७ - ३१ ऑगस्ट


BEHAN BOX

# डिजिटल जनगणना २०२७: महत्त्वाचे मुद्दे

- लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या जोडप्यांना विवाहित मानले जाईल, "जर ते त्यांच्या नात्याला एक ‘स्थिर सबंध’ समजत असतील.”

- SE दरम्यान एका कुटुंबासाठी एकच फोन नंबर ठेवण्याची शिफारस केली जाते, शक्यतो तो 'कुटुंबप्रमुखाचा' असावा—जी व्यक्ती दैनंदिन कामकाज सांभाळते आणि निर्णय घेते, आणि "कोणत्याही लिंगाची असू शकते."

- १९३१ नंतर प्रथमच जातींची पद्धतशीर गणना करणारी जनगणना.



BEHAN BOX

# डिजिटल जनगणना २०२७

- अशा डिजिटल जनगणनेचा डेटा गोपनीयता, पाळत आणि समावेशनावर काय परिणाम होईल?
- जर जनगणना कुटुंबाच्या ‘प्रमुखा’च्या नावाने केली जात असेल, तर महिलांच्या स्वायत्ततेवर आणि निर्णयक्षमतेवर याचा काय परिणाम होईल?
- सरकारला अधिक सशक्त करणाऱ्या 'लिव्ह-इन' कायद्यांमुळे आंतरजातीय, समलैंगिक/क्विअर आणि आंतरधर्मीय संबंधांवर काय परिणाम होईल?


भारतामधील जातिगणनेच्या इतिहासाविषयी, तसेच ‘जनगणना २०२७’ मध्ये जातीय भेदभावासोबतच जातीय सत्तासंबंधांचीही गणना का केली जावी, याबद्दल विदुषी ट्रिना विथयाथिल यांच्याशी साधलेला आमचा संवाद **behanbox.com** वर वाचा.


Behanbox Talkies Caste Census

‘Census 2027 Should Enumerate Caste Power Alongside Caste Apartheid’

Saumya Kalia

New Delhi | August 18, 2025



**पुढील काही आठवड्यांत आम्ही या प्रश्नांचा उलगडा करणार आहोत—आमच्यासोबत नक्की राहा!**

behanbox.com
instagram.com/behanbox

**BehanBoxच्या स्त्रीवादी निवडणूक न्यूजरूमसोबत जोडा: tinyurl.com/FEN-signup**

**BehanBoxच्या स्त्रीवादी निवडणूक (फेमिनिस्ट इलेक्शन) न्यूजरूममधील मानसी ठाकरे यांनी अनुवादित केले असून, अंजली यांनी संपादन केले आहे**